जगभर

# सौदी अरेबिया, हाँगकाँग आणि अफगाणिस्तान

## पुरन्दरे चन्द्रशेखर

या लेखात दोन-तीन महत्त्वाच्या घटनांचा संक्षिप्त आढावा घेतला आहे.

**मध्यपूर्व**

आधीच हा प्रदेश [अक्षरश:] ज्वालाग्राही आहे. त्यात १४ सप्टेंबरला सौदी अरेबियाच्या दोन तेल-उत्पादक कारखान्यांवर मानव-रहित स्वयंचलित अस्त्रांनी व क्षेपणास्त्रांनी हवाई हल्ला झाला. प्रचंड आग उसळती. त्यातील एक खाण जगातील सर्वात मोठी तेल-उत्पादक. दोन्ही खाणी लगेच बंद करण्यात आल्या. उत्पादन थांबले. सौदी अरेबिया जगातील प्रमुख तेल-उत्पादक असल्याने त्याच्या तेल-निर्यातीवरचा परिणाम सगळ्या जगावर होतो. उत्पादन व निर्यात अचानक कमी झाल्याने जगातील तेलाच्या पुरवठ्यावर त्वरित परिणाम झाला व या घटनेचे पडसाद म्हणजे सौदीकडून तेल आयात करणाऱ्या देशांत पेट्रोल, डिझेलचे भाव वाढले.

राजकीय स्तरावर परिणाम अधिक दूरगामी व गंभीर आहेत. सौदी अरेबियाला अमेरिकेचा पहिल्यापासून पाठिंबा आहेच. त्यात ट्रम्पच्या सत्ताग्रहणानंतर मोठीच वाढ झाली. [अध्यक्ष झाल्यावर ट्रम्पचा पहिला विदेश दौरा सौदीला होता.] तेल-हल्ल्याचे संकेत कळण्यासाठी स्थानिक चुरस पाहू.

सौदी अरेबिया आणि इराण या दोन मध्यपूर्वेवर नियंत्रण करू इच्छिणाऱ्या तेथील महाशक्ती. दोन्ही मुस्लिम असल्या तरी सौदी कट्टर सुन्नी तर इराण कट्टर शिया. सौदी अरब वंशाचे तर इराणी पर्शियन वंशाचे. दोघेही स्वत:ला दुसऱ्यापेक्षा श्रेष्ठ आणि इस्लामचे खरे पाईक मानतात. दोन्हींच्यात मध्यपूर्वेत प्रभाव वाढवण्यासाठी गेली अनेक वर्षे वैर, अप्रत्यक्ष हिंसक युद्धे चालू आहेत. अप्रत्यक्ष म्हणजे ही युद्धे तिसऱ्याच देशात होतात. या देशांच्या जनतेला त्याची प्रत्यक्ष झळ पोचत नाही. युद्धे होतात ती दुबळ्या देशांत जेथील त्या त्या पंथाचे अनुयायी आदर्शवाद आणि पैसे यांसाठी यातल्या एका देशावर अवलंबून असतात. बळी अर्थात तिथला सामान्य माणूस, गरीब जातो, तो कोणत्याही पंथाचा असेल. उदा.पॅलेस्टाईन, सीरिया, येमेन, इराक.

इराण अण्वस्त्रक्षमतेच्या जवळ आहे. सौदीला हा त्याच्या अस्तित्वाला धोका वाटतो. इराणने अण्वस्त्रक्षमता कमी करावी यासाठी ट्रम्पच्या आधीचा अमेरिकन अध्यक्ष ओबामाने मिनतवारीने इराण व इतर देश [अमेरिकेबरोबर मुख्यत: युरोप व रशिया] यांच्यात एक करार घडवून आणला. त्यानुसार इराण प्लुटोनियम या अण्वस्त्रे बनवण्यासाठी आवश्यक धातूच्या प्रक्रियेत एका विशिष्ट मर्यादेबाहेर जाणार नाही व अणु-बॉम्ब बनवू शकणार नाही. ट्रम्पचा अगदी वैयक्तिक म्हणावा असा आकस ओबामाविरुद्ध पहिल्यापासून आहे. त्यामुळे ट्रम्प या कराराची संभावना 'हा करार अमेरिकेचा सगळ्यात वाईट करार' अशी सतत करत असतो. इराणशी दुश्मनीही ट्रम्पने वाढवली. त्या दुश्मनीचा फायदा आज इराण घेत आहे, आपण मध्यपूर्वेत काहीही आक्रमकता दाखवली तरी अमेरिका बोलणे, तेल-निर्यातीवर व आंतर-राष्ट्रीय व्यापारावर बंदी घालण्याखेरीज फार काही करत नाही. सरळ युद्ध तर अमेरिका पुकारणार नाही कारण अमेरिकन सैनिक इराणविरुद्ध मरणे अमेरिका ओढवून घेणार नाही. या गृहीतावर इराण ताणता येईल तेवढे ताणत आहे असे दिसते. त्यात अमेरिका आणि युरोप इराणशी निराळ्या प्रकारे वागतात. ओबामापुरस्कृत अण्वस्त्र-क्षमतेच्या इराणबरोबरच्या करारात ते एकत्र होते. पण आता इराणच्या विरुद्ध अमेरिकेच्या पावलावर पाऊल टाकून युरोप इराणला वाळीत टाकत नाही. या दुफळीचा फायदाही इराण घेत आहे.

इराणमध्ये दोन अंतर्गत गट आहेत. एक कडवा, अमेरिकेच्या विरुद्ध - कोणत्याही परिस्थितीत अमेरिकेशी संवाद/संबंध करायचा नाही. हे धोरण इराणचा सर्वोच्च नेता - खामेनीचे. दुसरा, कमी कडवा -अध्यक्षाचा. हा गट अमेरिकेशी उद्या बातचीत करण्याची शक्यता अजमावतो. या कमी कडव्या गटाला अडचणीत आणण्यासाठी जास्त कडव्या गटाने सौदीवर हल्ला केला असावा असा एक खुलासा आहे. इराणचे अधिकृत म्हणणे आमचा या हल्ल्याशी संबंध नाही. तो

अमेरिका, सौदी आणि एमिरेट्स या इराणविरुद्धच्या आघाडीचा अपप्रचार आहे. लेख लिहिण्याच्या वेळी इराणने आमच्या भूमीवरील हल्ल्याला सर्वंकष युद्धाने उत्तर दिले जाईल असे जाहीर केले. त्यामुळे तणाव वाढतच आहे.

आता येमेन देशाकडे वळू. इतरत्रसारखेच येमेनमध्येही शिया व सुन्नी हे दोन तट आहेत. त्यांच्यात गेली चार वर्षे युद्ध चालू आहे. सुन्नी गटाला अमेरिका, सौदी अरेबियाचा सशस्त्र पाठिंबा आहे. तर हूथी नावाच्या गटाला इराणचा. तेल खाणीवरचा हल्ला आम्ही केला असे हूथींनी लगेच जाहीर केले. सौदीच्या त्यांच्यावरील हल्ल्यांचे हे प्रत्त्युत्तर असा त्यांचा दावा.

हा हल्ला करण्याची हूथींची तांत्रिक क्षमता नाही, त्यामुळे हा हल्ला इराणनेच केला असे अमेरिकेने तात्काळ जाहीर केले. [त्यात तथ्य असावे.] आणि आम्ही सौदीतर्फे त्याला उत्तर द्यायला सज्ज आहोत अशी धमकीही दिली. अशा घाईच्या निर्णयाला येऊ नका असे रशियाने बजावले. तर चीनने सबुरीचा सल्ला दिला. बहुधा या प्रसंगातून युद्धापर्यंत वेळ येऊ नये. पण मध्यपूर्व कधीही अशा कड्यापर्यंत येऊ शकते हे स्पष्ट झाले. त्याचे, विशेषत: सौदीच्या तेल-साम्राज्याचे परिणाम जगभरचा तेल-ग्राहक भोगतो.

**हाँगकाँग - अर्धविजय**

हाँगकाँग ही आधीची ब्रिटिश वसाहत. तिचे ब्रिटनपासून चीनला हस्तांतरण १९९७ ला झाले. हाँगकाँगमध्ये लोकशाही तर चीनमध्ये एकाधिकारशाही. या दोन राज्यव्यवस्था एकत्र कशा नांदतील हा तेव्हाच संदेह होता. त्याने आता उग्र संघर्षाचे रूप घेतले आहे. त्याला निमित्त म्हणजे चीनच्या दडपणाखाली हाँगकाँगच्या राजवटीने एक विधेयक आणले. त्याअन्वये हाँगकाँगमधील गुन्हेगारांचे [म्हणजे बहुश: चीनच्या राजकीय विरोधकांचे] खटले चीनमध्ये चालवले जातील, हाँगकाँगमध्ये नाही.

[हा विषय जुलैच्या अंकात हाताळला आहे.] लोकांचा तीव्र विरोध पहाता सरकारने अधिकृतरीत्या विधेयक सप्टेंबरमध्ये मागे घेतले. बहुतकरून अहिंसक आंदोलनापुढे सरकारने नमते घेणे हा विजय नोंदण्यासारखा पण तो संपूर्ण विजय नाही. कारण आजवर निषेध लाटांमध्ये खंड नाही. आता प्रश्न फक्त चीनची आपल्याला गैरसोयीचे विरोधक गुन्हेगार म्हणून जाहीर करणे व त्यांना चीनला नेणे एवढा मर्यादित राहिलेला नाही. मुळात हाँगकाँगची लोकशाही राजव्यवस्था विरुद्ध चीनची एकाधिकारशाही समोरासमोर ठाकल्या आहेत. दुर्दैवाची बाब म्हणजे हाँगकाँगमधील लोकशाहीचे पुरस्कर्ते आणि चीनचे पाठीराखे यांच्यात आता हिंसक संघर्ष होत आहेत. आजवर असे जे काही तुरळक प्रकार झाले ते पोलीस व विरोधक यांच्यात झाले. आता दोन्ही बाजूंनी नागरिक मैदानात उतरले आहेत. त्याने चीनला विरोध दडपण्यासाठी लष्करी कारवाई करण्याची सबब मिळेल. चीनने तशी धमकी दिलेली आहेच. दुसरा लोकशाही पुरस्कर्त्यांच्या अल्पदृष्टीने होणारा परिणाम म्हणजे त्यांनी या विवादात अमेरिकेने त्यांच्या बाजूने हस्तक्षेप करावा अशी इच्छा व्यक्त केली आहे. आधीच चालू असणाऱ्या चीन-अमेरिका व्यापारी शीतयुद्धात अशा मागण्यांनी भर पडणे शक्य आहे. ते हाँगकाँगच्या हिताचे नाही. अमेरिका लोकशाहीची परदेशात तर कधीच तारणहार नव्हती. त्यामुळे ही इच्छा बृहत् लोकशाहीसाठीही धोकादायक आहे.

**अफगाणिस्तान**

हे युद्ध गेली अठरा वर्षे चालू आहे. तलेबान ही 'धार्मिक' आतंकवाद्यांची संघटना, अमेरिकेचे तेथले सैन्य आणि अफगाण सरकार अशा या त्रिकोणाच्या बाजू आहेत. 'सल्तनत ए शाह आलम दिल्ली ता पालम' असे शेवटच्या मुघल सम्राटाविषयी म्हटले जात असे. म्हणजे या सम्राटाचे साम्राज्य दिल्लीपासून पालमपर्यंत! तोच प्रकार अफगाणिस्तानात आहे. निम्म्याहून अधिक देश तलेबानच्या अखत्यारीत आहे. अमेरिका काय किंवा सरकार काय यांनी आजवर तलेबानइतकेच किंबहुना जास्त सामान्य अफगाणांचे बळी घेतलेले आहेत. अमेरिकेला अफगाणिस्तान सोडायचा आहे पण मग मुस्लिम माथेफिरू आणखी फोफावतील आणि आपल्यापर्यंत पोचतील ही भीती आहे. ही अमेरिकेची बाजू. अफगाणिस्तानचे सरकार तलेबानला अमान्य आहे. त्यांच्या मते हे सरकार अमेरिकेचे बाहुले आहे. त्यामुळे युद्धविरामाच्या वाटाघाटी होणार कोणात हा पेच अलीकडेपर्यंत होता. अखेर अफगाण सरकारला वगळून तलेबान व अमेरिका यांनीच वाटाघाटी सुरू केल्या. त्यानुसार तलेबान हिंसा थांबवेल आणि अमेरिका तेथून आपले सैन्य हलवेल अशा दिशेने चर्चा सुरू झाली. आता काही आठवड्यात किंवा दिवसात हा तोडगा निघेल असे वाटत होते. तेवढ्यात तलेबानने त्यांचा

(पान ३५ वर)

(शहरनीती...पान २९ वरून)
दिसते ? एका बाजूला जात-धर्म-वर्ग ही समीकरणे आणि दुसरीकडे शतकांच्या वसाहतवादाने लादलेले, नवउदार अर्थनीतीने पुनर्व्याखांकित केलेले 'शोषण' यांच्या कात्रीत सापडलेला बहुसंख्य शहरी वर्ग शहरामध्ये परका, उपेक्षित होत जाताना दिसतो. शहराच्या परीघाकडे लोटला जाताना दिसतो. मुंबई महानगरातून परागंदा झालेल्या गिरणी कामगारापासून दिल्लीच्या सीमेवर राहणारा पण 'गुरगांव', 'फरीदाबाद' मध्ये स्थान न मिळू शकलेला बिहारी,उडिया वा बंगाली स्थलांतरित हेच वास्तव अधोरेखित करत आला आहे.

अर्बन ऑक्टोबरच्या निमित्ताने 'नागरी संघटना' एक महत्वाची भूमिका मांडू पाहात असताना त्याचे स्वागत करायला हवेच मात्र सावधपणे,आपल्या मातीतील संदर्भांचे-सर्वहारा शोषितांचे- व्यवस्थित भान ठेवूनच !

mayuresh.bhadsavle@gmail.com

(संपादकीय...पान ६ वरून)
आणि नेटाने संघ बांधणी झाली आहे. त्यांच्यासमोर टिकायचे तर राष्ट्र सेवा दलासारख्या माध्यमातून एक शिस्तबद्ध परंतु विचारी कार्यकर्त्यांचे मोहोळ नव्याने बांधावे लागेल. त्याला सांप्रत काळातील जन सामान्यांच्या प्रश्नांवरील लढे, तंत्रज्ञानाचा योग्य वापर, आणि शाश्वत विकासवादी रचनात्मक बांधणी यांची जोड द्यावी लागेल. भाजपच्या संघीय राजकारणाला प्रामाणिकपणे शह देऊ इच्छिणाऱ्या पक्षांनाही या प्रक्रियेत, त्यांच्या सोबतचे मतभेदाचे मुद्दे मांडत, बरोबर घेण्याचा प्रयत्न करावा लागेल. अशा प्रकारच्या निवडणुकीत सहभागी होणाऱ्यांपासून ते त्याबाहेर रहात दबावाचे राजकारण करणाऱ्यांपर्यंत आणि एकेका अन्यायाविरुद्ध लढणाऱ्यांपासून ते वैचारिक, साहित्यिक, सांस्कृतिक अंगाने प्रबोधन करणाऱ्यांपर्यंत सर्वांना सामावून घेणारी एक व्यापक, ठोस वैचारिकतेचा आग्रह धरणारी आणि व्यावहारिक पातळीवर अधिकाधिक जनसामान्यांना सहभागी करून घेणारी शाश्वत चळवळ हे दीर्घकालीन लक्ष्य ठरवून व्यापक राजकीय काम उभारण्याला पर्याय नाही !

**- संजय मं.गो., कार्यकारी संपादक**
९८६९९८४८०३

(आस्वाद...पान २७ वरून)
समाजाच्या त्यांच्याकडे बघण्याच्या दृष्टिकोनाची ?... हो. लहानपणी कुटुंबाचं प्रेम न मिळाल्यामुळे अस्वस्थ असलेल्या, थोडं मोठं झाल्यावर गुन्हेगारी प्रवृत्ती बनलेल्या मुलांची ?... हो. त्यांना प्रेम मिळाल्यावर त्यांच्यात झालेल्या बदलाची ?... हो.

तसं पाहिलं तर हे सगळेच मुद्दे गंभीर आहेत. पण दिग्दर्शिका एला लेमागन यांनी संपूर्ण चित्रपट हलक्या फुलक्या शैलीत हाताळला आहे, विषयाचं गांभीर्य कमी न करता. स्वीडन हा लैंगिक वेगळेपणा असणारे, म्हणजे एलजीबीटी यांच्या हक्कांच्या बाबतीत युरोपातही पुढे असणारा देश आहे. १९४४ पासून इथे समलिंगी लैंगिक संबंध कायदेशीर आहेत. समलिंगी विवाहांना इथे २००९ पासून मान्यता आहे आणि ही जोडपी मूल दत्तकही घेऊ शकतात. इतका खुलेपणा असल्यामुळेच बहुधा हा वेगळा आणि अशा नात्यांच्या बाबतीत खूप पुढे जाणारा चित्रपट इथे तयार झाला असावा. समाजाचा अस्वीकार, भेदभाव यांच्या पलीकडे जात 'पॅट्रिक १.५' लैंगिक वेगळेपणा असणाऱ्यांच्या एकमेकांबद्दलच्या प्रेमापलीकडच्या मानवी भावना उलगडून दाखवतो आणि एका वेगळ्याच उंचीवर पोहोचतो.

vaishali.rode@gmail.com

(जगभर...पान २५ वरून)
आणखी एक आत्मघातकी हल्ला केला व त्यात एक अमेरिकन सैनिक बळी पडला. तत्काळ ट्रम्पने या वाटाघाटी बंद करण्याचा निर्णय घेतला. या निर्णयाने आता तरी शांततेची शक्यता संपुष्टात आली आहे. चालू असणाऱ्या हिंसाचारात यापुढे अधिक अमेरिकन बळी जातील असे तलेबानने आधी जाहीर केले तर दोन दिवसातच 'आम्ही चर्चेला तयार आहोत' असेही जाहीर केले ! म्हणजे तलेबान ही एक संघटना नाही. त्यांच्यात एकाहून जास्त गट आहेत. काही हिंसाचार करत रहातात, काही निदान दिखाव्यासाठी चर्चा करतात. त्यातील कोण कोण आहे हे त्रयस्थाला [इथे अमेरिका] कळणे अशक्य आहे. या गटांत एकवाक्यता नाही. अमेरिका व तलेबान नावाने ओळखले जाणारे गट या दोन्ही बाजूंत एकवाक्यता फक्त एवढीच - सामान्य अफगाण माणसाच्या जीवनाला किंमत नाही. त्यामुळे हे विकृत हिंसक भयनाट्य चालू राहणार असे दिसते.

art-non-deco.com
artnondeco@yahoo.co.uk